# सन १९५६ चा मुंबई अधिनियम ५२[१]

## [२][महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम.]

[१२ डिसेंबर १९५६ रोजी राज्यपाल यांची अनुमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग चार मध्ये १७ डिसेंबर १९५६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० तसेच सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ (२६–१–१९७५)†

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (५–१२–१९७७)†

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ (२६–१२– १९७७)†

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ (२४–११–१९८०)@

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ (२०–७–१९८१)†$

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ (२९–७–१९८१)†£

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (३०–१२–१९९३)†££

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ (८–६–१९९५)†

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३

---

[१]उद्देश व कारणे याच्या निवेदनाकरिता मुंबई राजपत्र, १९५६, भाग पाच, पृष्ठे ३४५–४६ (इंग्रजी) पहा.

[२]सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या अनुसूची अन्वये " मुंबई विधानसभा व मुंबई विधानपरिषद " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

†ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

@सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक चौदा हा सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ च्या कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

$सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सात हा सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ च्या कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

£सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ हा सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ च्या कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

££सन १९९२ चा अध्यादेश क्रमांक १७ हा सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

[1][महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषद] यांचा सदस्य म्हणून निवडला जाण्याच्या व सदस्य म्हणून असण्याच्या बाबतीतील विवक्षित निरर्हता दूर करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, भारताच्या संविधानात, भारत सरकारचे किंवा उक्त संविधानाच्या पहिल्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही राज्य शासनाचे लाभपद धारण केल्याने ते धारण करणारी व्यक्ती राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास व सदस्य असण्यास निरर्ह ठरत नाही असे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे जाहीर करण्याबद्दल तरतूद करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, असे जाहीर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. [1][(१) या अधिनियमाला महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम असे म्हणावे.] संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो दिनांक १ नोव्हेंबर १९५६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. एखादी व्यक्ती यासोबत जोडलेल्या पहिल्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या अधिकार पदांपैकी कोणतेही पद धारण करते याच केवळ कारणावरून [2][महाराष्ट्र विधानसभेचा] किंवा [2][महाराष्ट्र विधानपरिषदेचा] सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा सदस्य असण्यास निरर्ह ठरणार नाही. विवक्षित निरर्हता दूर करणे.

१९५६ चा ३७. ३. शंका निरसनार्थ, यावरून असे जाहीर करण्यात येत आहे की, राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम २८ अन्वये किंवा कलम ३४ अन्वये मुंबई विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडून आली आहे किंवा निवडली गेली आहे असे समजण्यात आलेली व्यक्ती जे पद धारण केल्यामुळे ते धारण करणारी व्यक्ती राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडून येण्यास" किंवा निवडला जाण्यास किंवा राज्य विधानमंडळाचा सदस्य असण्यास निरर्ह ठरत नाही ते लाभपद आहे असे दुसऱ्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाद्वारे किंवा दिनांक १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याद्वारे जाहीर पद धारण करते एवढ्याच केवळ कारणावरून ती विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा निवडला जाण्यास किंवा विधानमंडळाचा सदस्य असण्यास निरर्ह ठरणार नाही. तात्पुरत्या तरतुदी.

१९५१ चा मुंबई २५. ४. मुंबईचा विधानमंडळाच्या सदस्यांबाबत (अपात्रता दूर करण्याबाबत) अधिनियम, १९५१ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. व्यावृत्ती.

---

[1]सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई विधानसभा " या शब्दांऐवजी सदर शब्द दाखल करण्यात आले.

## अनुसूची एक*

(कलम २ पहा)

१. [1][महाराष्ट्र शासनाच्या] मंत्र्यांच्या संसद सचिवांचे अधिकार पद.

२. शासकीय महाविद्यालयात अंशकालिक काम करणाऱ्या प्राध्यापकाचे किंवा अधिव्याख्यात्याचे अधिकार पद.

३. राष्ट्रीय छात्रसेना, प्रादेशिक सेना, वायुसेना, राखीव दल आणि साह्यकारी हवाई दल यातील कोणतेही अधिकार पद.

४. होमगार्डमधील कोणतेही अधिकार पद.

५. राज्य शासनाच्या प्राधिकाराअन्वये किंवा प्राधिकाराखाली रचना करण्यात आलेल्या ग्रामसंरक्षण दलातील (मग ते कोणत्याही नावाने ओळखण्यात येत असो) कोणतेही अधिकार पद.

[2][ * * * * *]

७. राज्य शासनाने रचना केलेली जिल्हा किंवा प्रादेशिक विकास मंडळांच्या (मग ती कोणत्याही नावाने ओळखण्यात येत असोत) सचिवांचे अधिकार पद.

परंतु असे अधिकार पद धारण करणारांनी राज्य शासनाचे इतर कोणतेही पद धारण केलेले नसावे.

८. आयुर्विमा (निकडीच्या तरतुदी) अधिनियम, १९५६ अन्वये ज्याच्या नियंत्रित धंद्याची व्यवस्था केंद्र सरकारकडे निहित झालेली आहे अशा विमाकाराच्या अधिकारांतील अधीन असलेले कोणतेही अधिकार पद. १९५६ चा ९.

**स्पष्टीकरणः**—या नोंदीच्या प्रयोजनाकरिता " नियंत्रित धंदा " व " विमाकार " या संज्ञाचे, त्यांना आयुर्विमा (निकडीच्या तरतुदी) अधिनियम, १९५६ मध्ये जे अर्थ दिलेले असतील तेच अर्थ असतील.

शासकीय व्यवस्थेखालील रुग्णालयातील मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्याचे किंवा मानसेवी सहायक वैद्यकीय अधिकाऱ्याचे अधिकार पद.

[3][९. अ. कोणत्याही सहकारी संस्थेच्या (सहकारी संस्थांची नोंदणीच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये जी नोंदविलेली असेल किंवा जी नोंदवण्यात आली आहे असे समजण्यात आले असेल अशा सहकारी संस्थेच्या) समितीच्या अध्यक्षाच्या किंवा सदस्याच्या अधिकार पदावर राज्य शासनाकडून नेमणूक करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशा समितीच्या अध्यक्षांचे किंवा सदस्यांचे अधिकारपद किंवा परिसमापकाच्या किंवा

---

*सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ चे कलम ६(४) देखील पहा

[1]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई सरकारच्या " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ३ अन्वये, नोंद ६ वगळण्यात आली.

[3]सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ च्या कलम ३ अन्वये नोंद क्रमांक ९अ नेहमीकरिताच समाविष्ट करण्यात आली.

सहपरिसमापकाच्या कोणत्याही अधिकारपदावर सहकारी संस्थांच्या निबंधकाकडून नेमणूक करण्यात आली असेल त्या बाबतीत असे परिसमापकाचे किंवा सहपरिसमापकाचे पद, किंवा निबंधकाने नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचे पद मग अशा व्यक्तीची व्यक्तिशः नेमणूक करण्यात आली असे किंवा त्याची नामनिर्दिष्ट व्यक्तींच्या मंडळावर नेमणूक करण्यात आलेली असो.]

१९५३ चा मुंबई ४०. १०. मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ अन्वये रचना केलेल्या कामगार कल्याण मंडळाच्या सभापतीचे किंवा सदस्याचे अधिकार पद.

१९६२ चा महा. ३. [1][१०अ]. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ याचे [2][कलम ४, पोट-कलम (१) चा खंड (ड), (ई), (फ), (ग) किंवा (ह)] अन्वये नामनिर्देशित केलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्याचे अधिकार पद, तो असे अधिकार पद धारण करतो केवळ याच कारणामुळे असे अधिकार पद.

[3][१०ब. मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० अन्वये रचना केलेल्या महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या किंवा महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग परिषदेच्या सदस्याचे (अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य सचिव धरून) अधिकारपद किंवा त्या अधिनियमांन्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या सदस्याचे पद.]

११. केंद्र किंवा राज्य शासनाने नेमलेल्या कोणत्याही समितीच्या किंवा संस्थेच्या सभापती किंवा सदस्याचे अधिकारपद.

परंतु, अशा समितीच्या किंवा संस्थेच्या सभापती किंवा कोणत्याही सदस्यास पूरक भत्त्याखेरीज इतर कोणतेही पारिश्रमिक मिळत असता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—या नोंदीच्या प्रयोजनाकरिता " पूरक भत्ता " या संज्ञेचा अर्थ, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा अधिकारपद धारकास, अशा अधिकारपदाचा धारक म्हणून समितीच्या किंवा संस्थेच्या सभेस हजर राहण्यासाठी किंवा कोणतीही इतर कामे करण्यासाठी त्यास झालेला व्यक्तिगत खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी दिलेला इतर भत्ता असा समजावा.

[4][१२. केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने किंवा संघ लोकसेवा आयोगाने किंवा

[5][महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने] घेतलेल्या कोणत्याही परीक्षेसाठी परीक्षकाचे अधिकारपद.

---

[1]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ६९ अन्वये नोंद क्रमांक १०अ दाखल करण्यात आली.

[2]सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ च्या कलम ५ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम ३९ अन्वये नोंद १०ब दाखल करण्यात आली.

[4]सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ च्या कलम २ अन्वये, नोंदी १२ व १३ दाखल करण्यात आल्या.

[5]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती) विषय आदेश, १९६० अन्वये " मुंबई लोकसेवा आयोगाने " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

१३. राज्य कामगार विमा अधिनियम, १९४८ अन्वये विमेदारास वैद्यकीय लाभ मिळण्याची तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमान्वये धारण केलेली पुढील अधिकारपदे :— १९४८ चा ३४.

(अ) विमा वैद्यक व्यवसायी याचे अधिकारपद.

(ब) राज्य कामगार विमा महामंडळाने किंवा राज्य शासनाने स्थापन केलेले रुग्णालय, दवाखाना, शुश्रूषागृह, प्रसुतिगृह किंवा इतर परिसंस्था यातील अंशकालिक काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे किंवा तज्ञाचे पद, आणि

(क) राज्य कामगार विमा महामंडळाने किंवा राज्य शासनाने विमेदारांना वैद्यकीय लाभ मिळण्याची तरतूद करण्यासाठी मान्यता दिलेल्या कोणत्याही खाजगी रुग्णालयात, दवाखान्यात, शुश्रूषागृहात, प्रसूतिगृहात किंवा इतर परिसंस्थेत त्या प्रयोजनासाठी नेमलेल्या वैद्यक व्यवसायी याचे अधिकारपद.]

[१][१४. राज्य शासनाने नेमलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस कमिशनच्या सभापती किंवा सदस्याचे पद ].

[२][१५. महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ या अन्वये रचना केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सदस्याचे (त्याचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह) किंवा त्या अधिनियमांन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांच्या सदस्याचे (त्याच्या सभापती किंवा उप सभापतीसह) किंवा त्या अधिनियमांन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही पंचायतीच्या सदस्याचे (सरपंच आणि उप सरपंच यांसह) अधिकारपद, केवळ तो असे अधिकारपद धारण करतो म्हणून ]. १९७७ चा महा. २८.

[३][१६. मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये रचना करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या किंवा या अधिनियमांन्वये रचना करण्यात आलेल्या त्याच्या कोणत्याही समित्यांच्या किंवा मंडळाच्या सदस्यांचे (सभापती किंवा उप सभापती यांसह) अधिकारपद.] १९७५ चा महा. ४.

[४][१७. राज्य शासनाने रचना केलेल्या महाराष्ट्र राज्य विधी आयोगाच्या सभापतींचे किंवा सदस्यांचे अधिकारपद.]

[५][१८. मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये रचना केलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या किंवा त्या अधिनियमान्वये रचना १९५० चा ६४.

---

[१]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम २ अन्वये, नोंद १४ दाखल करण्यात आली.

[२]सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम १९२ अन्वये मूळ नोंदीऐवजी ही नोंद बदली दाखल करण्यात आली.

[३]सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ च्या कलम १० (२) अन्वये नोंद १६ समाविष्ट करण्यात आली.

[४]सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम २ अन्वये नोंद १७ समाविष्ट करण्यात आली.

[५]सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ च्या कलम २ अन्वये नोंद १८ समाविष्ट करण्यात आली

केलेल्या त्याच्या कोणत्याही समित्यांच्या सदस्यांचे अधिकारपद (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह.)]

[1][१९. या अनुसूचीतील वरीलपैकी कोणत्याही नोंदीमध्ये ज्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही आणि ज्यावरील नेमणूक ही राज्य शासनाकडून करण्यात येते अशा, राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा राज्य शासनाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या कोणत्याही अन्य महामंडळाच्या, संचालक मंडळाच्या (मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो.) अध्यक्षाचे, उपाध्यक्षाचे किंवा कोणत्याही अन्य सदस्याचे अधिकारपद.]

**स्पष्टीकरण.**—या नोंदीच्या प्रयोजनांसाठी :—

(१) " महामंडळ " या संज्ञेचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा असेल व त्यात संस्था नोंदणी अधिनियम, १८६० हा महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्या अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेचा किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना केलेल्या कोणत्याही संस्थेचा समावेश होईल ;

(२) " राज्य शासनाकडून नियंत्रित केले जाणारे महामंडळ " या शब्दप्रयोगात ज्या मंडळाच्या भरणा झालेल्या भाग-भांडवलाच्या कमीत कमी पंचवीस टक्के भाग-भांडवल राज्य शासनाने धारण केलेले असेल त्या महामंडळाचा समावेश होईल.

[2][२०. महाराष्ट्र राज्य नियामक मंडळाचे कार्यकारी अध्यक्षांचे अधिकारपद.]

[3][२१. राज्य शासनाने रचना केलेल्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या सभापतींचे अधिकारपद.]

२२. महाराष्ट्र राज्य (राज्यपालांच्या विशेष जबाबदारीच्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र) आदेश, १९९४ अन्वये मा. राज्यपालांनी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळासाठी रचना केलेल्या विदर्भ विकास महामंडळ, मराठवाडा विकास महामंडळ आणि उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळाच्या अध्यक्षांचे अधिकार पद.

## अनुसूची दोन

(कलम ३ पहा)

(१) हैद्राबाद विधानसभा (निरर्हता निवारण) अधिनियम, १९५५
(सन १९५५ चा हैद्राबादचा अधिनियम क्रमांक १८)

(२) मध्यप्रदेश लाभपद (निरर्हता दूर करण्याबाबत) अधिनियम, १९५०
(सन १९५० चा मध्यप्रदेशाचा अधिनियम क्रमांक ७)

(३) सौराष्ट्र विधानसभा (निरर्हता निवारण) अधिनियम, १९५०
(सन १९५० चा सौराष्ट्राचा अधिनियम क्रमांक ६)

(४) राज्यपुनर्रचना अधिनियम, १९५६
(सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३७) याचे कलम २८ (५)

---

[1]सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ च्या कलम २ अन्वये नोंद १९ समाविष्ट करण्यात आली.

[2]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या कलम २ अन्वये नोंद २० समाविष्ट करण्यात आली.

[3]सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ च्या कलम २ अन्वये नोंद २१ समाविष्ट करण्यात आली.

# दहावी अनुसूची

[अनुच्छेद १०२ (२) आणि १९१ (२)]

## पक्षांतराच्या कारणावरून निरर्ह होण्यासंबंधी उपबंध

१. **निर्वचन.**— या अनुसूचीत, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,—

(क) " सभागृह " याचा अर्थ, संसदेचे कोणतेही सभागृह किंवा राज्याची विधानसभा किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या विधानमंडळाचे कोणतेही सभागृह असा आहे.

(ख) परिच्छेद २ किंवा [१][***], परिच्छेद ४ याच्या उपबंधानुसार कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य असलेला असा जो कोणी सभागृहाचा सदस्य असेल त्याच्या संबंधात " विधानमंडळ पक्ष " याचा अर्थ, त्या सभागृहांचे जे सदस्य त्या त्या वेळी उक्त उपबंधानुसार त्या पक्षाचे असतील असे सर्व सदस्य मिळून बनलेला गट असा आहे ;

(ग) सभागृहाच्या एखाद्या सदस्याच्या संबंधात " मूळ राजकीय पक्ष " याचा अर्थ, परिच्छेद २ मधील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ तो सदस्य ज्या पक्षाचा असेल तो राजकीय पक्ष असा आहे.

(घ) " परिच्छेद " याचा अर्थ, या अनुसूचीचा परिच्छेद असा आहे.

२. **पक्षांतराच्या कारणावरून निरर्ह होणे.**—(१) [२][परिच्छेद ४ व ५] यांतील उपबंधाच्या अधीनतेने, कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्य असलेल्या सभागृह सदस्याने,—

(क) जर अशा राजकीय पक्षाचे आपले सदस्यत्व स्वेच्छेने सोडून दिले तर ; किंवा

(ख) तो ज्या पक्षाचा आहे त्या राजकीय पक्षाकडून किंवा त्या पक्षाने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अगर प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाविरुद्ध जाऊन, जर दोहोंपैकी कोणत्याही बाबतीत अशा राजकीय पक्षाची, व्यक्तीची किंवा प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय, अशा सभागृहात मतदान केले किंवा मतदान करण्याचे वर्जिले असेल आणि अशा मतदानापासून किंवा वर्जनापासून पंधरा दिवसांच्या आत अशा राजकीय पक्षाने किंवा व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने असे मतदानाचे किंवा वर्जनाचे कृत्य क्षमापित केलेले नसेल तर ;

तो सभागृहाचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह होईल.

---

१. संविधान (एक्क्याण्णवे विशोधन) अधिनियम, २००३, कलम ५ द्वारे " परिच्छेद ३ किंवा प्रकरणपरत्वे," हे शब्द गाळले. (१ जानेवारी २००४ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता--कलम ५ द्वारे " परिच्छेद ३, ४ व ५ " या शब्दांऐवजी " परिच्छेद ४ व ५ " हे शब्द घातले. (१ जानेवारी २००४ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**— या पोट-परिच्छेदाच्या प्रयोजनार्थ,—

(क) सभागृहाचा निवडून आलेला सदस्य हा, त्याला ज्या पक्षाने अशा सदस्यत्वाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे केले होते त्या राजकीय पक्षाचा असल्याचे मानले जाईल ;

(ख) सभागृहाचा नामनियुक्त सदस्य हा,—

(एक) असा सदस्य म्हणून आपली नामनियुक्ती होण्याच्या दिनांकास कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य असेल त्या बाबतीत, तो अशा राजकीय पक्षाचा असल्याचे मानले जाईल ;

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, अनुच्छेद ९९ किंवा, प्रकरणपरत्वे, अनुच्छेद १८८ च्या आवश्यकतांचे पालन केल्यानंतर ज्या दिनांकास स्थानापन्न होईल त्या दिनांकापासून सहा महिने संपण्यापूर्वी तो ज्या राजकीय पक्षाचा सदस्य होईल किंवा प्रकरणपरत्वे, प्रथमतः सदस्य होईल त्या पक्षाचा तो असल्याचे मानले जाईल.

(२) सभागृहाचा निवडून आलेला जो सदस्य कोणत्याही राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार या नात्याने नव्हे तर अन्यथा असा सदस्य म्हणून निवडून आला असेल तो अशा निवडणुकीनंतर कोणत्याही राजकीय पक्षात सामील झाला तर, तो त्या सभागृहाचा सदस्य राहण्यास निरर्ह होईल.

(३) सभागृहाचा नामनियुक्त सदस्य अनुच्छेद ९९ किंवा, प्रकरणपरत्वे, अनुच्छेद १८८ च्या आवश्यकतांचे पालन केल्यानंतर ज्या दिनांकास स्थानापन्न होईल त्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर तो कोणत्याही राजकीय पक्षात सामील झाला तर, तो त्या सभागृहाचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह होईल.

(४) या परिच्छेदातील मागील उपबंधांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जी व्यक्ती, "संविधान (बावन्नावे विशोधन) अधिनियम, १९८५" याच्या प्रारंभास सभागृहाचा सदस्य असेल (मग ती असा सदस्य म्हणून निवडून आलेली असो वा नामनियुक्त झालेली असो) ती व्यक्ती—

(एक) अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी एखाद्या राजकीय पक्षाचा सदस्य असेल त्या बाबतीत, ती अशा राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार या नात्याने सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून आलेली आहे, असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल ;

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, कोणत्याही राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार या नात्याने नव्हे तर अन्यथा निवडून आलेला असा सभागृहाचा निर्वाचित सदस्य आहे असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (२) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल किंवा, प्रकरणपरत्वे, ती सभागृहाचा नामनियुक्त सदस्य आहे असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (३) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

[१][३. * * *]

**४. पक्षांतराच्या कारणावरून येणारी निरर्हता विलीनीकरणाच्या बाबतीत लागू नाही.**— (१) जर सभागृहाच्या एखाद्या सदस्याचा मूळ राजकीय पक्ष अन्य एखाद्या राजकीय पक्षात विलिन झाला आणि त्या सदस्याने असा दावा केला की, तो स्वतः व त्याच्या मूळ राजकीय पक्षाचे अन्य काही सदस्य,—

(क) हे अशा अन्य राजकीय पक्षाचे किंवा प्रकरणपरत्वे, अशा विलीनीकरणामुळे बनलेल्या नवीन पक्षांचे सदस्य झाले आहेत ; किंवा

(ख) यांनी विलीनीकरण स्वीकारलेले नाही व स्वतंत्र गट म्हणून कार्य करण्याचा पर्याय स्वीकारलेला आहे,

तर परिच्छेद २ च्या पोट-परिच्छेद (१) अन्वये तो निरर्ह ठरणार नाही आणि अशा विलिनीकरणाच्या वेळेपासून, असा अन्य राजकीय पक्ष किंवा नवीन राजकीय पक्ष किंवा, प्रकरणपरत्वे, गट म्हणजे तो सदस्य ज्या पक्षाचा आहे असा राजकीय पक्ष होय असे परिच्छेद २ मधील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ आणि तो त्याचा मूळ राजकीय पक्ष होय असे या पोट-परिच्छेदाच्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

(२) जर सभागृह-सदस्याच्या विधानमंडळ पक्षांपैकी किमान दोन-तृतीयांश एवढ्या सदस्यांनी मूळ राजकीय पक्षाच्या विलीनिकरणास संमती दिली तर व तरच फक्त संबंधित पक्षाचे विलीनिकरण घडून आले असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

**५. सूट.**— या अनुसूचीत काहीही अंतर्भूत असले तरी, जी व्यक्ती लोकसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष अथवा राज्यसभेचा उप सभापती अथवा एखाद्या राज्याच्या विधानपरिषदेचा सभापती किंवा उप सभापती अथवा एखाद्या राज्याच्या विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून त्या पदावर निवडून आलेली आहे ती व्यक्ती,—

(क) जर अशा पदावर निवडून आल्यामुळे अशा निवडणुकीच्या लगतपूर्वी ती ज्या राजकीय पक्षाची होती त्या पक्षाचे सदस्यत्व तिने स्वेच्छेने सोडून दिले आणि त्यानंतर जोवर ती असे पद धारण करीत

---

१. संविधान (एक्याण्णवे विशोधन) अधिनियम, २००३, कलम ५ द्वारे परिच्छेद ३ गाळला (१ जानेवारी २००४ रोजी व तेव्हापासून).

आहे तोवर त्या राजकीय पक्षात पुन्हा सामील झाली नाही किंवा अन्य राजकीय पक्षांचा सदस्य झाली नाही तर ; किंवा

(ख) अशा पदावर निवडून आल्यामुळे, अशा निवडणुकीच्या लगतपूर्वी ती ज्या पक्षाची होती त्या राजकीय पक्षाचे आपले सदस्यत्व तिने सोडून दिल्यावर जेव्हा ती असे पद धारण करण्याचेच बंद होईल तेव्हा ती अशा राजकीय पक्षात पुन्हा सामील झाली तर ;

ती या अनुसूचीअन्वये निरर्ह ठरणार नाही.

**६. पक्षांतराच्या कारणावरून येणाऱ्या निरर्हतेसंबंधीच्या प्रश्नांचा निर्णय.—**

(१) सभागृहाचा एखादा सदस्य या अनुसूचीअन्वये निरर्हतेस पात्र ठरला आहे किंवा काय असा कोणताही प्रश्न उद्‌भवला तर, तो प्रश्न अशा सभागृहाचा सभापती किंवा, प्रकरणपरत्वे, अध्यक्ष यांच्याकडे निर्णयार्थ निर्देशित केला जाईल व त्याचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, सभागृहाचा सभापती किंवा अध्यक्ष अशा निरर्हतेस पात्र झाला आहे किंवा काय असा प्रश्न उद्‌भवला असेल त्या बाबतीत, तो प्रश्न या संबंधात सभागृह निवडून देईल अशा सभागृहसदस्याकडे निर्णयार्थ निर्देशित केला जाईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

(२) या अनुसूचीअन्वये सभागृहाच्या एखाद्या सदस्याच्या निरर्हतेबाबतच्या कोणत्याही प्रश्नासंबंधी या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) अन्वये केले जाणारे सर्व कामकाज म्हणजे अनुच्छेद १२२ च्या अर्थानुसार संसदेतील कामकाज होय किंवा, प्रकरणपरत्वे, अनुच्छेद २१२ च्या अर्थानुसार राज्य विधानमंडळातील कामकाज होय असे मानले जाईल.

**७. न्यायालयांच्या अधिकारीतेस आडकाठी.—** या संविधानात काहीही अंतर्भूत असेल तरी, या अनुसूचीअन्वये सभागृहाच्या एखाद्या सदस्याच्या निरर्हतेशी निगडीत असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाला कोणतीही अधिकारीता असणार नाही.

**८. नियम.—** (१) या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (२) मधील उपबंधांच्या अधीनतेने, सभागृहाचा सभापती किंवा अध्यक्ष या अनुसूचीतील उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करू शकेल, आणि विशेषत: व मागील उपबंधांच्या व्यापकतेला बाधा न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल :—

(क) सभागृहाचे वेगवेगळे सदस्य ज्या पक्षांचे आहेत असे कोणतेही राजकीय पक्ष असल्यास त्याबाबत नोंदपुस्तके किंवा अन्य अभिलेख ठेवण्यासंबंधी ;

(ख) एखाद्या विधानमंडळ पक्षाच्या नेत्याला सभागृहाच्या एखाद्या सदस्याच्या संबंधात परिच्छेद २, पोट-परिच्छेद (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केल्यानुसार अशा सदस्यांबाबत कोणतेही क्षमापन करण्याविषयी जो अहवाल द्यावा लागेल आणि असा अहवाल किती मुदतीत व कोणत्या प्राधिकाऱ्याकडे सादर करावा लागेल त्यासंबंधी ;

(ग) एखाद्या राजकीय पक्षाला, सभागृहाच्या कोणत्याही सदस्यांना अशा राजकीय पक्षात प्रवेश देण्याबाबत जे अहवाल द्यावे लागतील आणि असे अहवाल संसदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सादर करावे लागतील त्यासंबंधी ; आणि

(घ) परिच्छेद ६ च्या पोट-परिच्छेद (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करण्याच्या कार्यपध्दतीसंबंधी—अशा प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी जी चौकशी करण्यात येईल अशा कोणत्याही चौकशीची कार्यपद्धती धरून ;

(२) या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) अन्वये सभागृहाच्या सभापतीने किंवा अध्यक्षाने केलेले नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, सभागृहापुढे एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी मांडण्यात येतील आणि तीस दिवसांचा उक्त कालावधी संपल्यानंतर ते नियम परिणामक होतील— मात्र तत्पुर्वी सभागृहाने ते आपरिवर्तनांसह किंवा त्याशिवाय मान्य केले अथवा त्याने व अमान्य केले तर गोष्ट अलाहिदा—आणि सभागृहाने ते याप्रमाणे मान्य केले तर, अशा मान्यतेनंतर ते ज्या रूपात मांडले गेले होते त्या किंवा, प्रकरणपरत्वे, अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होतील आणि जर ते याप्रमाणे अमान्य करण्यात आले तर, ते मुळीच परिणामक होणार नाहीत.

(३) एखाद्या सभागृहाची सभापती किंवा अध्यक्ष, अनुच्छेद १०५ किंवा, प्रकरणपरत्वे अनुच्छेद १९४ याच्या उपबंधास आणि या संविधानाखाली त्याला जी इतर कोणतीही शक्ती असेल तिला बाधा न येता, असे निर्देशित करू शकेल की, या परिच्छेदाखाली करण्यात आलेल्या नियमांचे कोणत्याही व्यक्तीकडून हेतुपुरस्सर व्यतिक्रमण झाल्यास त्याबद्दल सभागृहाच्या विशेषाधिकार भंगाच्या बाबतीत जशी कार्यवाही करण्यात येते तशाच पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल.

---